पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

सिटी न्यूज सुपरफास्ट

यवतमाळ ■ वर्ष १ ■ अंक १९ ■ शनिवार, दि. १३ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MAMAR/ 26 /A4531 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# अकोलेकरांच्या करांची लूट ....!
# पाणीटंचाईच्या नावाखाली 'टँकर' सुसाट!

## 230 रुपये प्रति किलोमीटरचा खर्च, आर टी ओ पासिंग झाले नसल्याची ओरड

प्रतिनिधी १३ जून




**अकोला:** पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या अकोलेकरांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार अकोला महानगरपालिकेत सुरू आहे. जनतेने रक्ताचे पाणी करून भरलेल्या करांची महापालिकेत कशी लूट सुरू आहे, याचा एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पाणीटंचाईच्या गंभीर परिस्थितीला 'संधी' समजून, महापालिकेतील काही अधिकाऱ्यांनी टेंडर काढत ९ ते १० टँकरचे काम लाडक्या कंत्राटदाराला बहाल केले आहे. या टँकरसाठी मोजला जाणारा दर ऐकून अकोलेकरांचे डोके चक्रावून गेल्याशिवाय राहणार नाही. प्रति टँकर २३० रुपये प्रति किलोमीटर या दराने हे टँकर भाड्याने घेण्यात आले असून, दररोज तब्बल १ ते सव्वा लाख रुपये जनतेच्या खिशातून कंत्राटदाराच्या घशात घातले जात आहेत.

एका महापालिका कर्मचाऱ्यालाच हे कंत्राट दिल्याची जोरदार चर्चा असून, पाणीटंचाईच्या नावाखाली 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' असा हा सरळ-सरळ मलिदा वाटपाचा प्रकार आहे. साठ दिवसांसाठी झालेल्या या करारातून कंत्राटदाराचे चांगलेच उखळ पांढरे होणार असून, अकोलेकरांच्या डोळ्यात मात्र धूळ फेकली जात आहे. मुळात टँकर असलेल्या टॅक्टर हा पुर्णतः पाण्याने भरला असेल तर एक लिटर डिझेल मध्ये ५ ते ६ किलो मीटर अंतर कापू शकते. त्याच वेळी टँकर मध्ये परतीच्या प्रवासात पाणी नसताना एक लिटर डिझेल मध्ये ७ ते ८ किलो मीटर अंतर पार होऊ शकते असा अंदाज या क्षेत्रातील तज्ञांनी व्यक्त केला. महापालिका प्रशासनाचा दावा आहे की, त्यांनी जीपीएस लावलेले टँकर भाड्याने घेतले आहेत. पण या दाव्याची हवा प्रत्यक्ष पाहणीत निघून गेली. या टँकरवर ना कोणते जीपीएस युनिट आहे, ना महापालिकेकडे याची कोणती कंट्रोल रूम! केवळ एका मोबाईल ॲपवर हे टँकर धावताना दाखवून दिशाभूल केली जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे ट्रॅक्टर आणि टँकरचे कुठलेही पासिंग नसतानाही हे अनधिकृत टँकर शहराच्या रस्त्यांवर बिनदिक्कत धावत आहेत. पाणीटंचाईत जनतेला दिलासा देण्याऐवजी भ्रष्टाचाराचे पाणी मुरवणाऱ्या या 'टँकर लॉबी'वर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई होणार का? की अकोलेकरांच्या करांची अशीच राजरोस लूट सुरू राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### गणिताचा आकडा की भ्रष्टाचाराचा महापूर

- एका टॅक्टर व टँकरचा प्रति किलोमीटर दर: २३० रुपये
- एका टँकरची रोजची सरासरी धाव: ५० किलोमीटर
- एका टँकरचे रोजचे भाडे: ११,५०० रुपये
- ९ टँकरचा रोजचा एकूण खर्च: तब्बल १ लाख ३ हजार ५०० रुपये!
- ६० दिवसांसाठी ९ टँकरचा भाडे : ६२ लाख १० हजार

### अकोलेकरांना काय मिळते

रोज १ लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च करून अकोलेकरांना काय मिळते तर ४ टँकर शहरात झाडांना पाणी घालण्यात मग्न आहेत, तर उर्वरित टँकर हद्दवाढ भागातील गुड्धी (१), शिवर (२) आणि मलकापूर (१) या भागात आणि नगरसेवकांच्या मागणीनुसार पाठवले जात असल्याचा दावा आहे. पण या टँकरच्या फेऱ्यांवर आणि किलोमीटरवर महापालिकेचे कुठेही नियंत्रण नाही. त्यामुळे किलोमीटर फुगवून 'पाण्यासारखा पैसा' लाटला जात असल्याचे स्पष्ट दिसत आहे. या महाघोटाळ्याबाबत जेव्हा जलप्रदाय विभागाचे अभियंता नरेश बावणे यांना विचारण्यात आले, तेव्हा त्यांनी कॅमेऱ्यासमोर मुलाखत देण्यास साफ नकार दिला. तर मुख्य अभियंता अमोल डोईफोडे हे नेहमीप्रमाणे उपलब्धच झाले नाहीत. जर कारभार स्वच्छ आहे, तर मग पालिकेचे अधिकारी तोंड का लपवत आहेत? हा निर्णय घेणारे पाठीराखे आता गप्प का आहेत, असा संतप्त सवाल अकोलेकर विचारत आहेत.

# आशिष देशमुखांचा खळबळजनक दावा

प्रतिनिधी १३ जून

**मुंबई:** राज्यात काँग्रेसमध्ये संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांनी जोर धरला असतानाच भाजप नेते आणि माजी आमदार आशिष देशमुख यांनी एक मोठा राजकीय दावा करून खळबळ उडवून दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हे दोन्ही पक्ष काँग्रेसमध्ये विलीन व्हावेत, यासाठी काही नेते प्रयत्नशील असल्याचा आरोप त्यांनी केला. एका वृत्तवाहिनीशी बोलताना आशिष देशमुख म्हणाले की, काही राजकीय नेत्यांची इच्छा आहे की शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काँग्रेसमध्ये विलीन व्हावा. त्यानंतर शरद पवार यांना राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद देण्यात यावे, अशीही त्यांची भूमिका असल्याचे त्यांनी सूचित केले. 'राज्यसभेचे विरोधी पक्षनेतेपद शरद पवारांना मिळावे, यासाठी दिल्ली दरबारी प्रयत्न सुरू आहेत,' असा दावा देशमुख यांनी केला. त्यामुळे विलीनीकरणाच्या चर्चांना आणखी हवा मिळाली आहे. त्यांच्या मते, उद्धव ठाकरे यांचे खासदार आणि पक्ष संघटना काँग्रेसमध्ये सामील झाल्यानंतर त्यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्षपद देण्याची चर्चा काही स्तरांवर सुरू असू शकते. 'आधी राष्ट्रवादी काँग्रेस काँग्रेसमध्ये विलीन करायची आणि त्यानंतर उद्धव ठाकरे गटाचा काँग्रेसमध्ये समावेश करायचा, अशी काहींची सुप्त इच्छा असू शकते,' असे देशमुख म्हणाले.

# कोकण रेल्वेवर 'तिसऱ्या डोळ्याची' नजर!



प्रतिनिधी १३ जून

**मुंबई :** मान्सून काळात कोकण रेल्वे मार्गावरील दरडी, दगड कोसळणे आणि रुळांवरील अडथळ्यांमुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता असते. मात्र यंदा अशा धोक्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी कोकण रेल्वेने कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे संभाव्य धोका आधीच ओळखून तात्काळ उपाययोजना करणे शक्य होणार आहे.

कोकण रेल्वेने दासगाव स्थानकाजवळील बोगद्याबाहेर अत्याधुनिक रेल्वे ट्रॅक निरीक्षण आणि इशारा प्रणाली बसवली आहे. ही प्रणाली सी-डॅकने विकसित केली असून रुळांवरील कोणताही अडथळा ओळखून नियंत्रण कक्षाला तत्काळ सूचना पाठवण्याची क्षमता तिच्यात आहे. सध्या या यंत्रणेची चाचणी सुरू असून ती यशस्वी ठरल्यास कोकण रेल्वे मार्गावरील इतर महत्त्वाच्या बोगद्यांजवळही अशी व्यवस्था उभारण्यात येणार आहे. मान्सूनपूर्व तयारीची माहिती देताना कोकण रेल्वेचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक संतोष कुमार झा यांनी रेल्वे प्रशासनाने यंदा पारंपरिक उपाययोजनांसोबत आधुनिक तंत्रज्ञानालाही प्राधान्य दिल्याचे सांगितले. गेल्या अनेक वर्षांत मान्सूनमुळे दीर्घकाळ रेल्वे वाहतूक ठप्प होण्याच्या घटना टाळण्यात यश मिळाल्याचा दावा त्यांनी केला.

**काय आहे या यंत्रणेची खासियत?**

नवीन प्रणाली रुळांवर पडलेले दगड, दरड, झाडे किंवा माती घसरण्याच्या घटना ओळखू शकते. इतकेच नव्हे तर रुळांवर आलेली जनावरे किंवा वन्यप्राणीही या यंत्रणेच्या नजरेतून सुटणार नाहीत. कोणतीही संशयास्पद हालचाल दिसताच नियंत्रण कक्षाला त्वरित सूचना मिळणार आहे.

# सहकारी आदिवासी विकास महामंडळांतर्गत ट्रक वाहनांचा ई-लिलाव

प्रतिनिधी १३ जून

**यवतमाळ :** महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यवतमाळ कार्यालयाअंतर्गत ट्रक वाहने ई-लिलावात विक्रीस ठेवण्यात येणार आहेत. या वाहनाची विक्री एनईएमएल या पोर्टलवर दि. १९ जून २०२६ रोजी दुपारी ११ ते ५ या वेळेत ई-लिलावाद्वारे करण्यात येणार आहे. हा लिलाव आदिवासी भागातील सुशिक्षित बेरोजगार अवजड परवानाधारकांसाठी आयोजित करण्यात आला आहे. या ई-लिलावात ट्रक क्रमांक एमएच १५ ईजी २०३१/३२/३३/३४ खरेदी वर्ष १८ जुलै २०१४ अनामत रक्कम २५ हजार रुपये असलेली ही वाहने ई-लिलावात विक्रीस ठेवण्यात येणार आहेत. या लिलावाच्या अटी व शर्तीनुसार ई-लिलावामध्ये जे आदिवासी बांधव सहभागी होतील अशा बांधवांकडे अवजड वाहन चालविण्याचा परवाना असणे अनिवार्य राहील. वाहने विक्री केल्यानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करुनच वाहने हस्तांतरित करण्यात येतील. तसेच वाहन ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत घ्यावे लागेल. अंतिम बोली मंजुर वा नामंजुर करण्याचा व निर्णय घेण्याचा अधिकार प्रादेशिक व्यवस्थापक यवतमाळ यांनी राखुन ठेवलेला आहे. लिलावाशी संबंधित सर्व बाबतीत प्रादेशिक व्यवस्थापक यांचा अंतिम निर्णय बंधनकारक राहील.

# विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी विशेष शिबिरे आयोजित करा

## यवतमाळ जिल्हा प्रशासनाचे तहसीलदारांना निर्देश

प्रतिनिधी १३ जून



**यवतमाळ :** विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील नागरिकांना आधार कार्ड, मतदार ओळखपत्र, जात प्रमाणपत्र आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तालुका व गाव पातळीवर विशेष शिबिरांचे तातडीने आयोजन करण्यात यावे, असे निर्देश इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक ओमप्रकाश नगराळे यांनी यवतमाळ जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना स्मरणपत्राद्वारे दिले आहेत.

विमुक्त जाती व भटक्या जमातीतील नागरिकांच्या भटक्या जीवनशैलीमुळे त्यांच्याकडे आधार नोंदणी किंवा मतदार नोंदणीसाठी आवश्यक असणारे अधिकृत दस्तऐवज (कागदपत्रे) उपलब्ध नसतात. यामुळे अनेक नागरिक लोकशाही प्रक्रियेपासून आणि शासकीय लाभांपासून वंचित राहतात. यावर उपाय म्हणून नागरिक वर्षातील काही दिवस ज्या ठिकाणी राहतात, ते ठिकाण किंवा त्यांनी निवडलेले सर्वसाधारण रहिवासाचे ठिकाण स्वयंघोषणापत्राद्वारे ग्राह्य धरून त्यांना आधार व मतदार कार्ड उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच यात्रा, मेळावे किंवा स्थानिक स्तरावर विशेष कॅम्प लावून वंचित नागरिकांचा शोध घ्यावा व त्यांची नोंदणी करावी.

ीर बहिरजी नाईक बहुरुपी समाज संस्था' (उमरी रोड, ता. केळापूर) व स्थानिक नागरिकांनी उपविभागीय अधिकाऱ्यांना सामूहिक निवेदन सादर केले आहे.

# भरधाव कारची धडक, चार मजूर जखमी

**अकोला :** पातूर रोडवरील हिंगणा फाट्याजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या कारने रस्त्याने चालणाऱ्या चार मजुरांना जोरदार धडक दिल्याची घटना शुक्रवारी दुपारी घडली आहे. या अपघातात चारही मजूर जखमी झाले असून, त्यापैकी महिला मजूर गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. एमएच ०२ सीडब्ल्यू ८२३४ क्रमांकाची कार वेगात असल्याने चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अपघातात जखमी झालेल्या चारही मजुरांना तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) रुग्णालयात दाखल करण्यात आले. यामध्ये तीन मजुरांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

# उमरखेड आयटीआयमध्ये २८४ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

प्रतिनिधी १३ जून

**यवतमाळ :** २१ जूनपर्यंत अर्ज करण्याची संधी आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पदवीपेक्षा कौशल्याला अधिक महत्त्व प्राप्त होत असून उद्योग क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची मागणी सातत्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर हु. म. चौ. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), उमरखेड येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक विद्यार्थ्यांना दि. २१ जून २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध आहे. संस्थेमध्ये वीजतंत्री, तारतंत्री, मोटार वाहन यांत्रिकी, डिझेल यांत्रिकी, वस्त्रनिर्मिती, सौंदर्यशास्त्र, संगणक चालक व प्रोग्रामिंग सहाय्यक, वेल्डर, फिटर तसेच पत्रा धातुकाम कारागीर या रोजगाराभिमुख व्यवसायांसाठी एकूण २८४ जागांवर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. वस्त्रनिर्मिती व सौंदर्यशास्त्र हे व्यवसाय महिलांसाठी शंभर टक्के राखीव असून इतर व्यवसायांमध्ये महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासन नियमानुसार आरक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी संस्थेमध्ये प्रवेश अर्ज भरणे व प्राधान्यक्रम निश्चित करण्याची सुविधा सुट्टीच्या दिवसांसह उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रवेश कालावधीत दररोज सकाळी १० ते ११ या वेळेत विद्यार्थी व पालकांसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. २१ जून पर्यंत प्रशिक्षणार्थी www.admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे, अर्जामध्ये दुरुस्ती करणे, अर्ज निश्चित करणे तसेच व्यवसाय व संस्थानिहाय प्राधान्यक्रम सादर करू शकतात. प्रवेश प्रक्रिया नियमित शासकीय ८० टक्के जागा तसेच संस्थात्मक व्यवस्थापन समिती (आयएमसी) कोट्यातील २० टक्के जागांसाठी गुणवत्ता यादीच्या आधारे राबविण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रिया, शुल्क व इतर सविस्तर माहिती संकेतस्थळावर तसेच संस्थेमध्ये उपलब्ध आहे. प्रशिक्षणादरम्यान पात्र प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा ५०० रुपये विद्यावेतन मिळते. याशिवाय समाजकल्याण विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, अल्पसंख्याक विभाग आणि इतर शासकीय योजनांमार्फत विविध शिष्यवृत्तींचा लाभ मिळतो. आयएमसी कोट्यात प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू असून दोन वर्षीय व्यवसाय पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना बारावी समकक्षता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येते. आयटीआयचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना भारतीय रेल्वे, अग्निवीर भरती, भारतीय वायुसेना, भारतीय नौदल, आयुध निर्माणी, महावितरण, राज्य परिवहन महामंडळ तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. याशिवाय उत्पादन उद्योग, वाहन उद्योग, वीज वितरण, बांधकाम आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत.

# एक हजार कोटींवर 'बेस्ट'ची बोळवण?
# पालिकेचा 4000 कोटींच्या मागणीला नकार

प्रतिनिधी १३ जून




**मुंबई :** एक हजार कोटीवर बेस्टची बोळवण असा प्रकार समोर आला आहे. या निधीपैकी ९३ कोटी ७८ लाख रुपये मालमत्ता करापोटी वजा करण्यात येणार असून उर्वरित रक्कम 'बेस्ट'ला दिली जाणार आहे. 'बेस्ट'ने थकीत निवृत्ती वेतनाची देणी, वाढता आर्थिक भार आणि बस ताफ्याची कमतरता दूर करण्यासाठी चार हजार कोटींची आर्थिक मदतीची आवश्यकता असल्याचे महापालिकेला कळविले होते. आर्थिक अडचणीत सापडलेल्या बेस्ट उपक्रमाला २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मुंबई महापालिकेकडून एक हजार कोटी रुपयांचे आर्थिक साहाय्य मिळणार आहे. बेस्ट प्रशासनाने चार हजार कोटी रुपयांच्या मदतीची मागणी केली होती. मात्र, स्थायी समितीपुढे मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावानुसार अखेर एक हजार कोटी रुपयांवरच बोळवण केली जाणार असल्याचे स्पष्ट झाले. या निधीपैकी ९३ कोटी ७८ लाख रुपये मालमत्ता करापोटी वजा करण्यात येणार असून उर्वरित रक्कम 'बेस्ट'ला दिली जाणार आहे. 'बेस्ट'ने थकीत निवृत्ती वेतनाची देणी, वाढता आर्थिक भार आणि बस ताफ्याची कमतरता दूर करण्यासाठी चार हजार कोटींची आर्थिक मदतीची आवश्यकता असल्याचे महापालिकेला कळविले होते.

१२ हजार कोटींची मदत महापालिकेने २०१४ ते २०२५-२६ या कालावधीत बेस्टला १२,३१२ कोटी सात लाख रुपयांचे अनुदान दिले आहे. मात्र, वाढता खर्च, प्रवासी उत्पन्नातील घट आणि आर्थिक दायित्वांमुळे उपक्रमाची आर्थिक स्थिती अद्याप स्थिर झालेली नाही. प्रस्तावात बेस्टच्या मालकीच्या काही मालमत्तांच्या अधिग्रहणाचाही उल्लेख केला असून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात येणार आहे. सुधारणांशिवाय पर्याय नाही 'बेस्ट'ची आर्थिक स्थिती सुधारावी, यासाठी २०१७ मध्ये तातडीच्या, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा आराखडा प्रशासनाने दिला होता. त्यानुसार खर्चात कपात आणि कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी 'बेस्ट'ने व्यापक सुधारणा करणे आवश्यक आहे. प्रवाशांना केंद्रस्थानी ठेवून सेवा कार्यक्षम बनविणे, तूट कमी करणे आणि आराखड्यानुसार कामाचे नियोजन करणे गरजेचे असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**बेस्टला मिळालेले अनुदान (कोटी रुपये)**

| आर्थिक वर्ष | अनुदान |
|---|---|
| २०१२-१३ व १३-१४ | १,६०० |
| २०१४-१५ | १५० |
| २०१५-१६ | २५.१० |
| २०१६-१७ | १०० |
| २०१७-१८ | १३.६९ |
| २०१८-१९ | १२.५६ |
| २०१९-२० | २,१५०.०३ |
| २०२०-२१ | १,११७.१० |
| २०२१-२२ | १,२६६.४० |
| २०२२-२३ | २,६३१.९४ |
| २०२३-२४ | १,४२८.७७ |
| २०२४-२५ | ८१०.३३ |
| २०२५-२६ | १,००६.१५ |
| एकूण | १२,३१२.०७ |

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
शनिवार दि. १३ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## डायबिटीजसाठी डार्क चॉकलेट खरंच अमृत आहे?

**अकोला :** रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्याच्या प्रयत्नात रुग्णांना त्यांच्या आवडीच्या अनेक पदार्थांवर पाणी सोडावे लागते, ज्यामध्ये चॉकलेटचा प्रामुख्याने समावेश असतो. अशा वेळी, पारंपरिक दुधाच्या चॉकलेटला एक आरोग्यदायी आणि सुरक्षित पर्याय म्हणून 'डार्क चॉकलेट' कडे पाहिले जाते. गेल्या काही वर्षांत डार्क चॉकलेटने आरोग्याविषयी जागरूक असणाऱ्या लोकांमध्ये आणि विशेषतः मधुमेहींमध्ये एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. 'डार्क चॉकलेट खाल्ल्याने रक्तातील साखर खरोखरच वाढत नाही का?' , 'ते मधुमेहासाठी पूर्णपणे सुरक्षित आहे का?' आणि 'ते रोज खाल्ले तर चालेल का?' यांसारखे अनेक प्रश्न नेहमी विचारले जातात. डार्क चॉकलेट हे प्रामुख्याने कोको बीन्स, कोको बटर आणि अतिशय कमी प्रमाणात साखर यांपासून बनवले जाते. वैज्ञानिक संशोधनानुसार, कोकोमध्ये मोठ्या प्रमाणावर फ्लेव्होनॉइड्स आणि अँटीऑक्सिडंट्स आढळतात, जे शरीरातील जळजळ कमी करण्यास आणि इन्सुलिनची संवेदनशीलता सुधारण्यास मदत करू शकतात.

# नेमबाजी क्रीडा प्रकारात महत्त्वाची भूमिका बजावणारे जसपाल राणा काळाच्या पडद्या आड !

जसपाल राणा (२८ जून १९७६ - १२ जून २०२६) हे एक भारतीय क्रीडा नेमबाज आणि प्रशिक्षक होते. राणा यांनी आशियाई खेळ आणि राष्ट्रकुल खेळांसह आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये अनेक पदके जिंकली आणि नेमबाजी क्रीडा प्रकारात भारताचे स्थान निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. ते राष्ट्रकुल खेळांच्या इतिहासातील भारताचे सर्वात यशस्वी खेळाडू आहेत, त्यांनी १९९४ , १९९८ , २००२ आणि २००६ या चार स्पर्धांमध्ये मिळून १५ पदके त्यात ९ सुवर्ण, ४ रौप्य आणि २ कांस्यजिंकली.

भारतीय नेमबाजीतील योगदानाबद्दल त्यांना १९९४ मध्ये अर्जुन पुरस्कार आणि १९९७ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याच्या स्पर्धात्मक कारकिर्दीपलीकडे, तो तरुण नेमबाजांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि भारतात नेमबाजीच्या वाढीसाठी योगदान देण्यासाठी देखील ओळखला जात होता, ज्यासाठी त्याला २०२० मध्ये द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मनू भाकरला दुहेरी कांस्य पदके जिंकण्यास मदत करण्याचे श्रेय राणाला दिले जाते.

जसपाल राणा यांचा जन्म १९७६ मध्ये उत्तराखंडमधील एका गढवाली कुटुंबात झाला . त्यांचे वडील नारायण सिंह राणा हे १९७१ च्या युद्धातील अनुभवी सैनिक आहेत, ज्यांनी इंडो-तिबेटियन बॉर्डर पोलिसात सेवा बजावली आणि नंतर २००० मध्ये उत्तराखंडचे पहिले क्रीडा मंत्री बनले. त्यांच्या वडिलांना नेमबाजी खेळातही रस होता आणि ते जसपालचे पहिले प्रशिक्षक होते. जसपालला सुषमा सिंह (राणा) आणि सुभाष राणा ही दोन भावंडे आहेत; त्यांची दोन्ही भावंडे देखील निपुण नेमबाज आहेत. वयाच्या १२ व्या वर्षी, जसपाल राणाने १९८८ मध्ये अहमदाबाद येथे झालेल्या ३१ व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत रौप्य पदक जिंकून आपल्या राष्ट्रीय पदार्पणातच पहिले यश मिळवले. त्याच्या या आश्चर्यकारक कामगिरीमुळे त्याला पहिल्याच विजयात प्रचंड प्रशंसा आणि कौतुक मिळाले. १९९४ साली इटलीतील मिलान येथे झालेल्या ४६ व्या जागतिक नेमबाजी स्पर्धेत (ज्युनियर विभाग) विश्वविक्रमी गुणांसह त्याने आपले पहिले भव्य आंतरराष्ट्रीय यश पटकावले.



राणाने १९९६ च्या अटलांटा ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आणि दोन पिस्तूल प्रकारांमध्ये भाग घेतला. त्याने पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात २९ वे आणि पुरुषांच्या ५० मीटर फ्री पिस्तूल प्रकारात ४५ वे स्थान मिळवले. त्याने १९९४ ते २००६ पर्यंत अनेक राष्ट्रकुल खेळांमध्ये पदके जिंकली . त्याने १५ पदके जिंकली, ज्यात ९ सुवर्ण, ४ रौप्य आणि २ कांस्य पदकांचा समावेश होता. त्याची सर्वात यशस्वी स्पर्धा २००२ मध्ये मँचेस्टर येथे झालेली राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा होती , जिथे त्याने सहा पदके जिंकली. दोहा येथे २००६ च्या आशियाई खेळांमध्ये , राणाने एक मोठा टप्पा गाठला, त्याने वयाच्या ३० व्या वर्षी चौथ्या आशियाई खेळांमध्ये भाग घेताना तीन सुवर्ण आणि एक रौप्य पदक जिंकले, ज्यामध्ये त्याने २५ मीटर सेंटर फायर पिस्तूलमध्ये ५९० गुणांसह जागतिक विक्रमाची बरोबरी केली. सुमारे २०१२ मध्ये, राणाने तरुण भारतीय क्रीडा नेमबाजांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. २०१८ पासून, पिस्तूल प्रशिक्षक जसपाल राणा ऑलिम्पिक पदक विजेता मनू भाकरला प्रशिक्षण देत आहेत , जरी भाकर आणि राणा २०२१ मध्ये थोडक्यात वेगळे झाले होते, परंतु २०२४ च्या ऑलिम्पिकची तयारी करण्यासाठी २०२३ मध्ये पुन्हा एकत्र आले. ऱाणाला भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा यांनी पाठिंबा दिला आणि त्यांनी त्यांच्या दैनंदिन वेळापत्रकात ऑलिम्पिक सामन्यांच्या नित्यक्रमाची प्रतिकृती तयार करून भाकरसाठी एक कठोर प्रशिक्षण वेळापत्रक विकसित केले.

२०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दुहेरी कांस्य पदके जिंकण्यात मदत केल्याबद्दल भाकरने प्रशिक्षक जसपाल राणा यांना श्रेय दिले आहे. जरी भाकर पदकांचे श्रेय राणा यांना देत असली तरी, त्यांनी सांगितले की ते फक्त एक प्रशिक्षक म्हणून आपली भूमिका बजावत होते आणि तिच्या प्रशिक्षणासाठी आपले १०० टक्के देत होते. राणा यांनी डेहराडूनमधील जसपाल राणा इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन अँड टेक्नॉलॉजीमध्येही प्रशिक्षण दिले. त्यांनी पुढे नमूद केले की प्रशिक्षण देणे ही त्यांची आवड होती आणि त्यांची डेहराडूनमधील प्रशिक्षण अकादमी कधीही पैसे कमावण्यासाठी नव्हती. २००६ च्या आशियाई खेळांनंतर लगेचच, राणा भारतीय जनता पक्षात (भाजप) सामील झाले आणि त्यांनी २००९ ची लोकसभा निवडणूक टिहरी मतदारसंघातून लढवली, जिथे त्यांचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे विजय बहुगुणा यांच्याकडून पराभव झाला.

### वैयक्तिक जीवन आणि मृत्यू

त्यांचे कुटुंब उत्तराखंडच्या गढवाल प्रदेशातील असून ते क्रीडा आणि राज्य राजकारणात सक्रिय आहे. त्यांचे वडील नारायण सिंह राणा हे एक युद्ध सैनिक आहेत जे २००० मध्ये उत्तराखंडचे पहिले क्रीडा मंत्री बनले. त्यांना सुषमा सिंह (राणा) आणि सुभाष राणा ही दोन भावंडे आहेत. सुषमा सिंह या भाजपचे प्रख्यात नेते राजनाथ सिंह यांच्या सून आहेत . त्यांची दोन्ही भावंडे देखील निपुण नेमबाज आहेत. त्यांचे लग्न आरुषी वर्मा यांच्याशी झाले होते, ज्या एक पर्यावरणवादी, इंटिरियर डिझायनर आणि पिस्तूल व शॉटगनमधील राष्ट्रीय स्तरावरील नेमबाज आहेत. राणा यांचे १२ जून २०२६ रोजी नवी दिल्लीत वयाच्या ४९ व्या वर्षी झोपेत असताना हृदयक्रिया बंद पडल्याने निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल भारताचे राष्ट्रपती, भारताचे पंतप्रधान आणि इतर अनेक राजकीय नेत्यांनी शोक व्यक्त केला.

## टीईटी परीक्षेमध्ये सेवेतील शिक्षकांना विशेष सवलत देण्यात यावी

विनाअनुदानित, अंशतः अनुदानित शिक्षकांना शासकीय सेवेतील सवलती व फायद्यांचा लाभ नाही, मग टीईटी परीक्षा का? डीएड, बिएड परीक्षा, त्यासाठी घेतली जाणारी पूर्व परीक्षा, वरिष्ठ वेतनश्रेणी प्रशिक्षण व इतर प्रशिक्षण सर्व बंद करून फक्त टीईटी परीक्षा घेणेच योग्य नाही का?महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा आता २८ जून रोजी होणार असून, नीट परीक्षेमुळे ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती?या परीक्षेसाठी ६ लाखांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, यामुळे वर्षानुवर्षे शिकवणाऱ्या जुन्या शिक्षकांमध्ये भीती व तीव्र नाराजीचे वातावरण आहे.

सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असणाऱ्या शिक्षकांसाठी ही टीईटी एक अग्निपरीक्षा असून, शिक्षकांना सक्तीने सेवानिवृत्त करणार असल्याचे मत शिक्षकांनी व्यक्त केले आहे. मात्र पाच वर्षे सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना सूट मिळाली असून, पदोन्नतीसाठी टीईटी आवश्यक आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे मुलांना शिकवून त्यांच्या परीक्षा घेणाऱ्या वयाची पन्नाशी ओलांडलेल्या शिक्षकांनाही आता स्वतः अभ्यास करून परीक्षा पास करण्याचे आव्हान आहे. त्यामुळे शिक्षकांच्या मागे लागलेला परीक्षेमुळे शिक्षकांची दैनावस्था झाली आहे. या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

न्यायालयाच्या निर्णयानुसार टीईटी पदवीशिवाय कोणीही शिक्षक होऊ शकत नाही. मग आतापर्यंत शिक्षक बनण्यासाठी आवश्यक असलेल्या डी. एड., बी.एड., डी. एल. एड. किंवा इतर अनेक प्रशिक्षण अभ्यासक्रम पदव्या का घेतल्या जातात? डीएड, बीएड साठी पूर्व परीक्षा का घेतल्या जातात? वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षण का? असे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जबाबदारी सांभाळून जनगणना, निवडणुका, मतदार याद्या अद्यावत करणे, नवसाक्षरता अभियान, शाळाबाह्य सर्वेक्षण, यु-डायस प्लस, शालेय पोषण आहार, आधार कार्ड, विविध समित्यांचे रेकॉर्ड, शिष्यवृत्ती परीक्षा, अशी असंख्य प्रकारची कामे ऑनलाइन -ऑफलाइन रात्र - दिवस कामाच्या ओझ्याखाली दबलेल्या शिक्षकाची परीक्षा घेणे कितपत योग्य आहे. टीईटी परीक्षा घेणे एवढे महत्त्वपूर्ण असेल तर मग वरील सर्व प्रशिक्षण, परीक्षा सर्व बंद कराव्या व फक्त टिईटी परीक्षाच शिक्षकांसाठी लागू करावी. तसेच वरील सर्व कामे करून शिक्षक परीक्षा देणार असल्यामुळे त्यांच्यासाठी विशेष सवलत परीक्षेमध्ये देण्यात यावी. त्याचप्रमाणे अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शिक्षकांसाठी शासकीय सेवेतील कोणतेही नियम लागू होत नाहीत मग टिईटी हा निर्णय का लागू असावा, जर हा टीईटी परीक्षेचा निर्णय लागू करणे योग्य असेल तर मग शासकीय सेवेतील सवलती व फायदे विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षकांना लागू कराव्यात व त्याचा लाभ देण्यात यावा. असे एक ना अनेक प्रश्न निर्माण झाले असल्यामुळे शिक्षकांची दयनीय अवस्था झाली असुन नाराजी व्यक्त केली आहे.

**प्रा. प्रज्ञानंद थोरात**
अकोला मो. ९८२२६७४४८७

## न्यू तापडीया नगरमधून तरुण बेपत्ता
### सिव्हील लाईन पोलिसांत गुन्हा दाखल

प्रतिनिधी १३ जून

**अकोला :** अकोला शहरातील न्यू तापडीया नगर परिसरातून एक व्यक्ती कोणालाही काहीही न सांगता निघून गेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सिव्हील लाईन पोलीस स्टेशन येथे मिसिंग(बेपत्ता) तक्रार नोंदवण्यात आली असून पोलीस सध्या या व्यक्तीचा कसून शोध घेत आहेत.

तक्रारदार शकुंतला नंदलाल शाहू यांनी दिलेल्या जबानी रिपोर्टवरून ही तक्रार दाखल करण्यात आली आहे. ३१ मे २०२६ रोजी सकाळी ०८:३० वाजताच्या सुमारास बंटी नंदलाल शाहू हा न्यू तापडीया नगर, अकोला येथून कोणालाही काहीही न सांगता कुठेतरी निघून गेले आहेत. नातेवाईकांनी त्यांचा अकोला शहर, परिसर आणि इतर संभाव्य ठिकाणी शोध घेतला; परंतु त्यांचा कुठेही पत्ता लागला नाही. शेवटी ३ जून २०२६ रोजी सिव्हील लाईन पोलीस ठाण्यात यासंबंधी मिसिंग नं. ६५/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



बंटी नंदलाल शाहू, मजबूत बांधा, रंगाने गोरा,चेहरा गोल, मोठे डोळे, सरळ नाक आणि डोक्यावर केस आहेत. अंगात भुरकट रंगाचा टी-शर्ट आणि काळ्या रंगाची साधी पँट, पायात साधी चप्पल, मराठी व हिंदी भाषा येत असलेल्या या बेपत्ता व्यक्तीबाबत कोणालाही काहीही माहिती किंवा सुगावा लागल्यास, त्यांनी खालील क्रमांकांवर तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे: सिव्हील लाईन पोलीस स्टेशन, अकोला ०७२४-२४१४११७ असे आवाहन करण्यात आले आहे.

## युरिक ॲसिड शरिरासाठी धोकादायक

**अकोला :**
युरिक ॲसिड वाढणे ही केवळ सांधेदुखीची समस्या नसून किडनी, सांधे आणि एकूणच मेटाबॉलिक आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते.

शरीरात प्युरीन्सचे विघटन झाल्यानंतर तयार होणारे युरिक ॲसिड योग्य प्रकारे बाहेर पडले नाही, तर ते सांध्यांमध्ये साचून तीव्र वेदना आणि सूज निर्माण करू शकते. दीर्घकाळ दुर्लक्ष केल्यास सांध्यांची हालचाल कमी होण्याचा धोका वाढतो. योग्य आहार, भरपूर पाणी, वजन नियंत्रण आणि जीवनशैलीतील बदल यांच्या मदतीने युरिक ॲसिड नियंत्रणात ठेवता येते.

### दिन विशेष
## जगातील नंबर एकची तिरंदाज : दीपिका कुमारी



आज जन्मदिवस

दीपिका कुमारी (जन्म: १३ जून १९९४) ही एक भारतीय तिरंदाज आहे. सध्या ती जागतिक क्रमवारीत ५ व्या क्रमांकावर आहे.ती जगातील एक नंबरचा तिरंदाज आहे.२०१० च्या राष्ट्रकुल खेळात तिने महिलांच्या रिकर्व्ह इव्हेंटमध्ये सुवर्णपदक पटकावले. तिने डोला बॅनर्जी आणि बॉम्बायला देवीसह महिलांच्या टीम रिकर्व्ह स्पर्धेत सुवर्ण पदक देखील जिंकले. दीपिका कुमारी लंडन येथे २०१२ मध्ये झालेल्या उन्हाळी ऑलिंपिक स्पर्धेसाठी पात्र ठरली, तिथे तिने वैयक्तिक व सांघिक स्पर्धांमध्ये भाग घेतला.

२०१२ मध्ये भारताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते तिला अर्जुन पुरस्कार हा भारतातील दुसरा सर्वोच्च क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात आला. फेब्रुवारी २०१४ मध्ये, तसेच तिला फिक्की स्पोर्टस् ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.भारत सरकारने तिला २०१६ मध्ये पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित केले.

दीपिका कुमारी यांचा जन्म १३ जून १९९४ रोजी झाला. त्यांचे वडील शिवनेरायण महातो हे एक सायकलरिक्षा चालक आहेत आणि आई गीता महातो रांची मेडिकल कॉलेज मध्ये नर्स आहेत. तिचे पालक रांचीपासून १५ किमी अंतरावर असलेल्या रतू चिती गावात राहतात. सुरुवातीच्या काळात पालकांना दीपिकाच्या स्वप्नास आर्थिकदृष्ट्या समर्थपणे पाठिंबा देणे अवघड होते. त्यांच्या कुटुंबाकडे तिच्यासाठी नवीन उपकरणांची खरेदी करण्यासाठी पैसे नव्हते. परिणामी दीपिकाने घरगुती बाण वापरून तिरंदाजीचा सराव केला. दीपिकाची चुलतबहीण विद्या कुमारी या टाटा आर्चरी अकादमीमध्ये शिकत होत व तिने दीपिका कुमारीला आपली प्रतिभा विकसित करण्यास मदत केली. दीपिकाने २००५ मध्ये जेव्हा अर्जुन आर्चरी ॲकेडमीमध्ये प्रवेश केला तेव्हा त्यांची पहिला विक्रम प्रस्थापित केली गेली. या संस्थेची स्थापना मुख्यमंत्री मीरा मुंडा यांनी केली. खारसाना येथे अर्जुन मुंडा पण २००६ मध्ये तिची व्यावसायिक धनुर्विद्या सुरू झाली ती जमशेदपूरमधील टाटा आर्चरी अकादमीमध्ये सामील झाली..इथेच तिने योग्य उपकरणे आणि एकसमान दोन्ही प्रशिक्षण सुरू केले. तिला त्यांचे ५०० रुपये मिळाले. २००९ च्या नोव्हेंबर महिन्यात कॅडेट वर्ल्ड चॅम्पियनशिपचे विजेतेपद जिंकल्यानंतर दीपिका प्रथम तीन वर्षांतून घरी परतली.

## गजानन महाराज मंदिरात भागवत कथा

प्रतिनिधी १३ जून

**अकोला :** शिव नगरातील श्री गजानन महाराज मंदिरात भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.



यासाठी गजानन महाराज मंदीरातील कार्यकारिणी सह, व्यवस्थापक किशोर फुलकर, उमक परीवार व डोईफोडे परिवाराने परीश्रम घेतले. हरिपाठ मंडळ, तसेच गणेशराव डोईफोडे, नंदकिशोर उमक, अशोक उमक, गजानन पातळे, ज्ञानदेव पातळे, सौ. प्रमिलाताई डोईफोडे, अंजली उमाळे, अशोक उमकसौ. साधना ताई उमक, सौ. रेखाताई उमक, निताताई उमक, प्रफुल्ल डोईफोडे, सौ. अंजलीताई डोईफोडे, अंजली उमाळे, गौरव उमाळे, सौ. सविता नायसे, सौ. जयाताई गासे, ज्ञानेश्वर नायसे, सुरेश गासे, गौरी वासनकर सोनाक्षी वासनकर, विधी दंडगव्हाळ,शांभवी डोईफोडे, रोहीत टेकाडे, इत्यादींनी भागवत कथेत सेवा दिली. शिवनगर परिसरांतील व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी अधिक मासा निमित कथा श्रवण केली. आज काल्याचे किर्तनासह भागवत कथेची सांगता होत आहे. अशी माहिती विष्णूपंत जोध यांनी कळविली आहे.

## कोलड्रींक्स शरीरासाठी घातकच!

**अकोला :**कडक उन्हाळ्यात थंडगार कोला पिणे असो किंवा जेवताना एखादे आईस-कोल्ड पेय घेणे, आजकाल अनेकांच्या दैनंदिन जीवनात 'कोल्ड ड्रिंक्स' हा एक अविभाज्य भाग बनला आहे. परंतु, या थंड पेयांचा आपल्या पचनसंस्थेवर काय परिणाम होतो, यावरून अनेकदा वादविवाद आणि उलटसुलट चर्चा रंगतात. कोल्ड ड्रिंक्समुळे खरोखरच पोट खराब होते का? त्यांचा आतड्यांवर वाईट परिणाम होतो का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कोल्ड ड्रिंक्समुळे तोंडाचा कर्करोग होऊ शकतो या दाव्यात काही तथ्य आहे का? या प्रश्नांचे उत्तर वाटते तितके साधे नाही. यामागील वैद्यकीय सत्य आणि पचनसंस्थेचे विज्ञान समजून घेणे गरजेचे आहे.



### निधन वार्ता

**सुशीला वासुदेव हुशे**



**अकोट :** तालुक्यातील ग्राम वडाळी देशमुख येथील प्रतिष्ठान नागरिक दिलीप वासुदेव हुशे यांच्या आई यांच्या राहत्या वयाच्या ८६ वर्षी वृद्धपकाळाने गुरुवार दुपारी २ वाजता निधन झाले यावेळी बहुसंख्य नागरिकांनी श्रद्धांजली वाहली त्यांच्या पक्षात दोन मुलं व एक मुलगी बराच मोठा नातवंडाचा आप्तपरिवार आहे.

**सुमन प्रतापराव देशमुख**



**अकोट :** तालुक्यामधील ग्राम वडाळी देशमुख येथील प्रतिष्ठित नागरिक शरद प्रताप देशमुख यांच्या आई सुमन प्रताप देशमुख यांचे राहत्या घरी वयाच्या ९० वर्षी वृद्धपकाळाने शुक्रवार सकाळी ११ वाजता निधन झाले. त्यांच्या पक्षात दोन मुले व एक मुलगी असा बराच मोठा नातवंडाचा आप्तपरिवार आहे,

## चान्नी ठाण्याचे ठाणेदार गंगाधर दराडे रुजू

### नव्या ठाणेदाराकडून नागरिकांच्या अपेक्षा उंचावल्या

प्रतिनिधी १३ जून

**आलेगाव :** चान्नी पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी सहाय्यक पोलीस निरीक्षक गंगाधर दराडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी १० जून रोजी आदेश काढून ही नियुक्ती जाहीर केली. यापूर्वी चान्नी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले ठाणेदार रवींद्र लांडे यांची नागपूर येथे बदली करण्यात आली आहे. ठाणेदार गंगाधर दराडे यांनी जवळपास तीन वर्ष पिंजर पोलीस ठाण्याचा कार्यभार सांभाळला आहे.त्यांनी ११ जून रोजी चान्नी पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारताना ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. त्यांच्या नियुक्तीमुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

नवीन ठाणेदार म्हणून गंगाधर दराडे यांच्याकडून नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर भर दिला जाईल, अशी आशा स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**अवैध धंदे बंद करण्याचे आव्हान !**
चान्नी पोलीस स्टेशन हद्दीत ४४ गाव असून, परिसरात वरली मटका,देशी दारू,जुगार, आदी अवैध धंदे बंद करण्याचे नवीन ठाणेदार समोर आव्हान आहे. नवीन ठाणेदार रुजू होतात कारवाईचा सपाटा सुरू केला जाते, नंतर हप्ते खोरीमुळे अवैध धंदे करणाऱ्या माफ्यांना अभय दिले जाते, हे अवैध धंदे बंद करण्याचे रुजू झालेले नवीन ठाणेदार गंगाधर दराडे यांच्यासमोर आव्हान आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. १३ जून २०२६ | http://epaper.citynewssuperfast.com

# अकोल्यात अवैध वाहतुकीवर एसटी महामंडळाचा प्रहार !

प्रतिनिधी १३ जून







**अकोला :** एसटी महामंडळाच्या उत्पन्नाला चुना लावणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात अकोला विभागात सध्या हायव्होल्टेज कारवाई सुरू आहे. महामंडळाचे अध्यक्ष आणि परिवहन मंत्री यांच्या सूचनेनंतर, सुरक्षा व दक्षता शाखेने वाहतूक



पोलिसांच्या मदतीने अकोला जिल्ह्यात एकाच वेळी धडक मोहीम हाती घेतली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या दौऱ्यापुर्वी व दौऱ्यानंतर वास्तव बातम्या केवळ सिटी न्यूज सुपरफास्ट व आर आर सी न्यूज प्रसारीत केल्या. त्यानंतर अखेर एस.टी.महामंडळ व शहर वाहतुक शाखेने कारवाईचा धडाका सुरु केला आहे. यामुळे राज्याच्या महसुलात वाढ होणार असून अवैध प्रवासी वाहतुकीला लगाम लागेल.

अकोला मध्यवर्ती बसस्थानक, टॉवर बसस्थानक आणि इतर परिसरातील तब्बल पाचशे अवैध वाहनांवर थेट कारवाईचा बडगा उगारण्यात आला. या धडक मोहिमेदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांकडून जवळपास ४-५ लाख रुपयांचा दंड जागीच वसूल करण्यात आला आहे. बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात कोणतीही अनधिकृत वाहने उभी राहू नयेत, यासाी हा परिसर 'नो पार्किंग झोन' म्हणून कडकपणे लागू करण्यात आला आहे. राज्यभरात ५ ते १५ जून दरम्यान राबवल्या जाणाऱ्या विशेष मोहिमेचा भाग म्हणून अकोल्यात या संयुक्त कारवाईने अवैध वाहतूकदारांचे धाबे दणाणले आहेत. अवैध प्रवासी वाहतूक आणि अनधिकृत वाहनतळांमुळे एसटी महामंडळाच्या उत्पन्नाला मोठा फटका बसत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत होत्या.

# सिद्धार्थ रूहाटियांच्या रूपाने प्रथमच विदर्भाच्या वाटेला उपाध्यक्षपद

प्रतिनिधी १३ जून

◆ शतकभराच्या इतिहासानंतर ऐतिहासिक निवड



**अकोला :** 'एमएसीसीआयए' अर्थात महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर या राज्यातील अग्रगण्य व्यापारी व औद्योगिक संघटनेच्या निवडणुकीत विदर्भाने यंदा ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. चेंबरच्या १०० वर्षाच्या इतिहासात प्रथमच विदर्भाच्या वाट्याला उपाध्यक्षपद आले असून, अकोल्याचे युवा उद्योजक सिद्धार्थ रूहाटिया यांची विदर्भ उपाध्यक्षपदी अविरोध निवड झाली आहे. त्यामुळे विदर्भाच्या व्यापारी, औद्योगिक आणि कृषी क्षेत्राला राज्यस्तरीय व्यासपीठावर अधिक प्रभावी प्रतिनिधित्व मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

या निवडणुकीत विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यांचे उपाध्यक्षही अविरोध निवडून आल्याने विदर्भाचा संघटनात्मक प्रभाव अधोरेखित झाला आहे. तसेच सुमित मालाणी, अमित पडगिलवार, कैलाश खंडेलवाल, पंकज राठी, संतोष मुंदडा, दिनेश समाद्दर, उमेश नरनोलिया, प्रकाश सावजी, राजन ठाकूर, राहुल खराबे, जिनेंद्रकुमार छाबरा, पंकज बाजड, नंदकिशोर राऊत, पारस कोठारी आणि मुकेश पारेख यांची शासकीय परिषद सदस्य म्हणून अविरोध निवड झाली.

दरम्यान, वरिष्ठ उपाध्यक्षपदासाठी करुणाकर शेट्टी आणि संगीता पाटील यांच्यात झालेल्या चुरशीच्या लढतीचा निकाल १५ जून रोजी जाहीर होणार आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नव्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात येणार असून, राज्यातील उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्राशी संबंधित विविध प्रश्नांवर धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहेत. विदर्भाला मिळालेले हे प्रतिनिधित्व प्रदेशातील उद्योग, व्यापार आणि कृषी विकासासाठी नवे दालन उघडणारे ठरणार असल्याचा विश्वास व्यापारी व औद्योगिक क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

> ◆ 'महाराष्ट्र चेंबरच्या शतकभराच्या इतिहासात प्रथमच विदर्भाला उपाध्यक्षपद मिळणे ही संपूर्ण प्रदेशासाठी अभिमानाची बाब आहे. हे पद माझे नसून विदर्भातील उद्योजक, व्यापारी आणि शेतकरी बांधवांचे प्रतिनिधित्व करणारे आहे. विदर्भ मुख्यालय अकोल्यात सुरू करण्यासह प्रदेशाच्या विकासासाठी आम्ही प्रभावीपणे काम करू.'
> - **सिद्धार्थ रूहाटिया**, विदर्भ उपाध्यक्ष, (एमएसीसीआयए)

# जनगणनेचा पहिल्या टप्प्यात जिल्ह्यात 100 टक्के घरगणना पूर्ण

प्रतिनिधी १३ जून

**अकोला :** राष्ट्रीय जनगणना कार्यक्रमात अकोला जिल्ह्याने घरगणनेचा टप्पा पूर्ण केला आहे. जिल्ह्यात घरगणनेचे १०० टक्के काम पूर्ण झाले आहे.

प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात घरगणनेची प्रक्रिया परिपूर्ण नियोजन, जलद गतीने व समन्वय ठेवून राबविण्यात आली. जिल्ह्यात १४ चार्ज अधिका-यांच्या नेतृत्वात गावोगाव प्रगणक (गणक) कर्मचाऱ्यांकडून घरोघरी जाऊन तपासणी करण्यात आली. जिल्ह्यात एकुण २ हजार ३९९ घरगटांचे काम मुदत संपण्याच्या दोन दिवस अगोदर पुर्ण करण्यात आले.

पहिल्या टप्प्यात घरांची स्थिती, घरात उपलब्ध असलेल्या सुविधा (उदा. पिण्याचे पाणी, वीज, शौचालय) आणि मालमत्ता यांची नोंद मोबाईल ॲपद्वारे (डिजिटल पद्धतीने) करण्यात आली. कुलूपबंद घरे किंवा काही अडचणींमुळे राहिलेल्या घरांचे सर्वेक्षण फेरतपासणी करून पूर्ण करण्यात आले. उन्हातान्हात फिरून कर्मचा-यांनी माहितीचे संकलन केले व जनगणनेचा पहिला टप्पा पूर्ण केला. जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी सर्व चार्ज अधिकारी व जिल्ह्यातील संपूर्ण चमूचे अभिनंदन करून त्यांना जनगणनेच्या पुढील कार्याकरीता शुभेच्छा दिल्या आहेत.

# ट्रक दुरुस्ती सुरू असताना हल्ला

प्रतिनिधी १३ जून

**खामगाव :** शहरातील भैयुजी महाराज आश्रम परिसरात ट्रकची दुरुस्ती सुरु असताना चालक व वाहनमालकावर चौघांनी हल्ला केल्याची घटना ११ जून रोजी रात्री घडली. या हल्ल्यात वाहनमालक गंभीर जखमी झाला असून, शिवाजीनगर पोलिसांनी एका अट्टल गुन्हेगारासह तीन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, झोडगाव येथील शाहरूख खान रऊफ खान (३०) हे मालवाहू चालक आहेत. गुरुवारी रात्री ११:३० वाजच्या सुमारास ते वाहनमालक शिवाजी यांच्यासह भैयुजी महाराज आश्रमाजवळ उभ्या असलेल्या ट्रकची दुरुस्ती करीत होते. त्यावेळी समीर शेख हा दोन ते तीन साथीदारांसह तेथे आला. काही वेळातच आरोपींनी दोघांसोबत वाद घालत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी चालक व वाहनमालकाला मारहाण केली. हल्ला अधिक तीव्र करत आरोपींनी शिवाजी यांना पकडून आश्रमाच्या कमानीवर डोके आपटल्याचा आरोप आहे. एवढ्यावरच न थांबता रस्त्यावरील दगड उचलून त्यांच्या डोक्यात मारण्यात आल्याने ते गंभीर जखमी झाले. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# नोकरीचे आमिष दाखवून साडेदहा लाखांची फसवणूक

प्रतिनिधी १३ जून

## महिलेविरूद्ध गुन्हा दाखल

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथे लिपिक पदावर कायमस्वरूपी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत एका महिलेने दाम्पत्याची तब्बल साडेदहा लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी खोटी कागदपत्रे तयार करून आर्थिक फसवणूक केल्याबद्दल जुने शहर पोलिसांनी संबंधित महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील वाशीम बायपास परिसरातील रहिवासी श्रीकांत बाबुराव सरदार (४०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या पत्नी यांची गांधी रोड येथील एका ब्युटी पार्लरच्या संचालिकेशी ओळख झाली होती. त्या माध्यमातून स्वाती स्वप्निल जुनगडे (इंगळे), रा. गुरुदेव नगर, बाळापूर नाका, जुने शहर, अकोला हिची भेट झाली. स्वाती जुनगडे हिने पीकेव्ही अकोला येथे लिपिक पदाच्या जागा उपलब्ध असून, आपल्या ओळखीच्या माध्यमातून कायमस्वरूपी नोकरी मिळवून देऊ शकते, असे सांगत विश्वास संपादन केला. यानंतर तिने नोकरीसाठी मूळ कागदपत्रांसह आगाऊ रक्कम मागितली. तक्रारदाराने मार्च २०२५ मध्ये दीड लाख रुपये तिच्या बँक खात्यात जमा केले. त्यानंतर विविध टप्प्यांवर आरटीजीएस, बँक व्यवहार व फोन-पेच्या माध्यमातून आणखी रक्कम देण्यात आली. मुलाखतीसाठी बोलावणे, कागदपत्रांची पडताळणी, अंतिम या घटनेमुळे सरकारी नोकरीच्या मुलाखत, वैद्यकीय तपासणी आणि नियुक्ती प्रक्रिया सुरू असल्याचे सांगून वेळोवेळी पैसे उकळण्यात आले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तक्रारदाराने आरोपी महिलेकडे पैशांची मागणी केली. मात्र, तिने रक्कम परत करण्यास नकार देत उडवाउडवीची उत्तरे दिली. यानंतर तिचे पती स्वप्निल जुनगडे यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांनी दिलेल्या एकूण रकमेपैकी साडेपाच लाख रुपये परत केले. मात्र, उर्वरित साडेचार लाख रुपये परत मिळाले नाहीत. या संपूर्ण प्रकारात सरकारी नोकरीचे आमिष दाखवून बनावट कागदपत्रे तयार करण्यात आली आणि विश्वास संपादन करून लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याच तक्रारीच्या आधारे जुने शहर पोलिसांनी बीएनएस कलम ३१८ (४), ३३६ (३) अन्वये स्वाती स्वप्निल जुनगडे यांच्याविरूध्द गुन्हा नोंद केला असून, आर्थिक व्यवहार, बनावट कागदपत्रे आणि सदर व्यक्तींची सखोल चौकशी सुरू केली आहे.

> **मोठे रॅकेट असण्याची शक्यता**
> ◆ नावाखाली सुरू असलेल्या फसवणुकीच्या रॅकेटबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांनी अशा आमिषांना बळी न पडण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# आता 10 तास आधी मिळेल कन्फर्मेशन

प्रतिनिधी १३ जून




**अकोला :** आता ट्रेन सुटण्याच्या १० तास आधी प्रीपेड चार्ट तयार केले जात आहेत. पूर्वी यासाठी फक्त चार तासांचा वेळ लागत असे. भारतीय रेल्वेच्या या नवीन व्यवस्थेमुळे नागपूर ते मुंबई प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. पूर्वी ही एक समस्या होती. नागपूर-मुंबई मार्गावरील बहुतेक गाड्या रात्री धावतात. विदर्भ एक्सप्रेस, अंबा नगरी एक्सप्रेस, सेवाग्राम एक्सप्रेस आणि दुरंतो एक्सप्रेस यांसारख्या गाड्यांसाठी तिकीट कन्फर्मेशन ही एक सततची चिंता होती. पूर्वी, ट्रेन सुटण्याच्या फक्त चार तास आधी चार्ट तयार केले जात असत, ज्यामुळे प्रवाशांना संध्याकाळपर्यंत थांबावे लागत असे. जेव्हा चार्ट येत, तेव्हा तिकिटे अनेकदा आर.एस. (RS) किंवा प्रतीक्षा यादीतच राहत असत. त्यामुळे रात्री पर्यायी व्यवस्था शोधणे जवळजवळ अशक्य होते. आता, १० तास आधी चार्ट तयार होत असल्याने, प्रवाशांना दिवसा त्यांच्या सीटची स्थिती कळेल. जर त्यांची तिकिटे कन्फर्म झाली नाहीत, तर ते सहजपणे पर्यायी ट्रेन, बस किंवा वाहतुकीचे इतर साधन बुक करू शकतील. अकोला अमरावती आणि नागपूरहून मुंबईला प्रवास करणाऱ्या प्रवाशांना या बदलामुळे मोठा फायदा झाला आहे. रेल्वेच्या या निर्णयाचा नागपूर आणि मुंबई दरम्यान नियमित प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना, नोकरदारांना आणि व्यावसायिकांना विशेष फायदा होईल.

# नारायणा ई-टेक्नो स्कूलसह आरडीजीला शिक्षणाधिकाऱ्यांची शो कॉज !

प्रतिनिधी १३ जून

◆ उच्च न्यायालयाच्या आदेशाची केली अवहेलना, इतर शाळांचीही केली पाहणी

**अकोला :** मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विदर्भातील सर्व शाळा ३० जूनपासून सुरु करण्याचे स्पष्ट निर्देश दिले असतानाही कौलखेड येथील नारायणा ई-टेक्नो स्कूल व आरडीजी स्कूलमध्ये वर्ग सुरू असल्याचे समोर आल्याने शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. न्यायालयीन आदेश आणि शासनाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करत शाळा सुरू ठेवल्याप्रकरणी माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहरे यांनी शाळा प्रशासनाला कारणे दाखवा नोटीस बजावत २४ तासांत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच बाल शिवाजी हायस्कूल जठारपेठ भागातील शाळांसह अनेक शाळांची या पथकाने पाहणी केली.

विशेष म्हणजे, शिक्षण विभागाने यापूर्वीच ११ जून रोजी लेखी सूचना देऊन न्यायालयीन आदेशांचे पालन करण्यास सांगितले होते. मात्र, त्यानंतरही शाळेचे वर्ग सुरू असल्याची तक्रार प्राप्त झाली. त्यानुसार विस्तार अधिकारी (शिक्षण) विनोद मानकर यांनी १२ जून रोजी नारायणा ई-टेक्नो स्कूलला प्रत्यक्ष भेट देऊन जिओ-टॅगिंगद्वारे पडताळणी केली असता शाळेत अध्यापन सुरू असल्याचे निदर्शनास आले. तसेच उपशिक्षणाधिकारी प्रमोद टेकाडे यांनी आरडीजी स्कूलची पाहणी केली असता ती शाळाही सुरू असल्याचे आढळून आले होते. शिक्षण विभागाने या प्रकाराला अत्यंत गंभीर मानले असून, हा प्रकार उच्च न्यायालयाच्या आदेशाचा थेट अवमान असल्याचे नोटिसीत नमूद करण्यात आले आहे. २४ तासांत समाधानकारक खुलासा न केल्यास किंवा खुलासा सादर न केल्यास संबंधित बाब शासन व उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनेही या प्रकरणाची तक्रार शिक्षण विभागाकडे केली होती. त्यानंतर प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू करत संबंधित शाळेविरोधात कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. उच्च न्यायालयाने विदर्भातील शाळा ३० जूनपासून सुरू करण्याचे आदेश दिले होते. ११ जून रोजी शिक्षण विभागाने शाळेला लेखी सूचना दिली. त्यानुसार १२ जून रोजी जिओ-टॅगिंग पडताळणीत शाळा सुरू असल्याचे आढळले. वर्गाचे नियमित संचालन सुरू असल्याचा अहवाल दिला आहे.

> **नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर तातडीने कार्यवाही करा!**
> ◆ शहरात अनेक भागात प्रखर उन्हातही शाळा सुरु करण्यात आल्या असून, विद्यार्थ्यांना साध्या गणवेशात बोलावून वर्ग घेत जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे शिक्षणाधिकाऱ्यांनी शहरातील शाळांना भेटी देऊन पाहणी करावी. त्यानंतर सत्य समोर येईल, असे पालकवर्गासह सामाजिक संघटनांकडून मागणी होत आहे. त्यानुसार शिक्षण विभागाने १२ जून रोजी शहरातील शाळांची पाहणी केली असून, यातील दोन शाळांना शोकॉज नोटीस बजावण्यात आली. तसेच जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना १२ जून रोजी पत्र पाठवित ज्या शाळा उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करून सुरु असतील त्यांच्यावर तातडीने कार्यवाही करून तसा अहवाल अकोला शिक्षण विभागाला सादर करण्याचे आदेशही शिक्षणाधिकारी माध्यमिक अरविंद मोहरे यांनी या पत्रातून दिले आहेत.

# दहा संचालकांचा अटकपूर्व जामीन फेटाळला !

प्रतिनिधी १३ जून

◆ जिल्हा व सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय, गजानन नागरी पतसंस्था घोटाळा प्रकरण

**अकोला :** डाबकी रोड परिसरातील गजानन नागरी पतसंस्थेतील तब्बल १६ कोटी ७९ लाख २७ हजार ९३० रुपयांच्या आर्थिक घोटाळा प्रकरणातील दहा संचालकांचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक एक पी. बी. नाईकवाड यांच्या न्यायालयाने शुक्रवारी फेटाळल्याने आरोपींच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. ठेवीदारांचा विश्वास संपादन करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप या प्रकरणात समोर आला आहे. जिल्हा विशेष लेखा परीक्षक यांनी दिलेल्या तक्रारीवरून डाबकी रोड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६ (२), ३१६(५), ३(५) तसेच महाराष्ट्रठेवीदारांच्या हितसंरक्षण अधिनियम (एमपीआयडी) १९९९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याच तक्रारीनुसार, गजानन नागरी पतसंस्था, डाबकी रोड, अकोला येथे नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात मुदत ठेवी स्वीकारण्यात आल्या होत्या. मात्र, मुदत संपल्यानंतरही ठेवीदारांना त्यांची रक्कम परत करण्यात आली नाही. संस्थेचे अध्यक्ष, व्यवस्थापक, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संचालक मंडळाने संगनमताने ठेवीदारांची दिशाभूल करून आर्थिक फसवणूक केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. दरम्यान, संचालक शिवलाल बोर्ड (८०) रा. शास्त्री नगर, हनुमंत खानझोडे (७५) रा. जय हिंद चौक, रमेश थोरात (७४) रा. रिंग रोड, रामराव घाटे (८०) रा. लक्ष्मी नगर, प्रमोद भटूरकर (६१) रा. वानखडे नगर, डाबकी रोड, राजेश अनासुने (५५) रा. मेहरे नगर, डाबकी रोड, काशीराम मेंगे (८४) रा. रिंग रोड कौलखेड, नरेश डोंगरे (४७) रा. भीम नगर, सुनंदा उजवने (५५) रा. गजानन नगर, प्रमिला शिंगारे (६५) रा. माळीपुरा यांचा न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. न्यायालयात सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी विधिज्ञ ॲड. राजेश आकोटकर यांनी कामकाज पाहिले.

> **आर्थिक अनियमिततेचे गंभीर स्वरूप उघड**
> विशेष म्हणजे, या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी सन २०२२ पासून सुरू होती. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या तपासणीत आर्थिक अनियमिततेचे गंभीर स्वरूप उघड झाले. त्यानंतर सखोल चौकशी करण्यात आली आणि कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराचे धक्कादायक वास्तव समोर आले.

> **आतापर्यंत १८२ गुंतवणूकदारांच्या तक्रारी**
> आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासात आतापर्यंत १८२ गुंतवणूकदारांच्या तक्रारी समोर आल्या आहेत. त्यामुळे घोटाळयाची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक ठेवीदारांनी आयुष्यभराची बचत या संस्थेत गुंतविल्याने त्यांच्यामध्ये भीती, अस्वस्थता आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जनगणनेच्या कामात अकोला महानगरपालिका राज्यात दुसऱ्या क्रमांकावर

प्रतिनिधी १३ जून



**अकोला :** जनगणनेच्या पहिल्या टप्पा अंतर्गत १ मे २०२६ या रोजी अकोला महानगरपालिका क्षेत्रामध्ये मनपा आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ.सुनील लहाने यांच्या मार्गदर्शनात जनगणाना कार्यास प्रारंभ करण्यात आला. या कामात अकोला महापालिका राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

जनणनाच्या कामामध्ये मनपा आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ.सुनिल लहाने व विभागीय समन्वयक प्रवीण भगत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आणि जिल्हा समन्वयक कार्तिक गडलिंग यांचेसह सर्व क्षेत्रीय प्रशिक्षक आणि तांत्रिक अधिकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या बद्दल मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांनी त्यांच्या दालनात शहर जनगणना अधिकारी व सर्व चार्ज अधिकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन कौतुक केले. यावेळी अद्यापही तीन दिवसाचा कालावधी शिल्लक असल्याने चार्ज अधिकारी यांनी प्रगणकाव्दारा सादर कामाचे स्वनिरीक्षण करून तांत्रिक चुका झाल्या असल्यास त्या तातडीने दुरूस्त करून १०० टक्के बिनचूक अहवाल जनगणना संचालनालया कडे सादर करावा अशा सुचना देऊन चार्ज अधिकारी यांनी शहर जनगणना कामाकरिता अहोरात्र परिश्रम केल्याने तसेच त्यांचे अधिनस्त कार्यरत पर्यवेक्षक व प्रगणक यांनी सुध्दा उन्हाची तमा न बाळगता घरोघरी भेटी देऊन यशस्वीरित्या काम केल्याने या सर्वांचे अभिनंदन केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शनिवार, दि. १३ जून २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# टीबी रुग्णालयाची जागा 'लीज'वर देण्याच्या ठरावावरुन सत्ताधारी-विरोधक आमनेसामने

प्रतिनिधी १३ जून

## बहुमताने मंजुरी; काँग्रेसचा विरोध, शिवसेना तटस्थ

**यवतमाळ :** शहराच्या मध्यवर्ती भागातील टीबी रुग्णालयाची जागा 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' (बीओटी) तत्त्वावर विकासकाला देण्याच्या प्रस्तावावरून नगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत शुक्रवारी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र वाद झाला. अखेर मतदानाद्वारे हा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.

नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत टीबी रुग्णालयाच्या जागेवर सुमारे ९५ कोटी रुपयांच्या खर्चातून व्यापारी संकुल उभारण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्याचा विषय चर्चेला आला. या प्रस्तावाला काँग्रेसच्या नगरसेवकांनी तीव्र विरोध दर्शवत पालिकेच्या मालमत्तेचे नुकसान करून जागा विकासकांच्या घशात घातली जात असल्याचा आरोप केला.

यापूर्वी दोन वेळा काढलेल्या निविदांना अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने तिसऱ्यांदा आलेल्या विकासकास मंजुरी देण्याचा प्रयत्न होत असल्याचे विरोधकांचे म्हणणे होते. याउलट, या प्रकल्पातून नगरपालिकेला दरवर्षी नियमित उत्पन्न मिळेल, असा दावा सत्ताधाऱ्यांनी केला. यामुळे सभागृहात दोन्ही बाजूंमध्ये जोरदार खडाजंगी झाली.

वाद वाढल्यानंतर ठरावावर मतदान घेण्यात आले. त्यात २४ नगरसेवकांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले, तर १२ नगरसेवकांनी विरोध दर्शविला. शिवसेनेच्या चार नगरसेवकांनी तटस्थ भूमिका घेतली. त्यामुळे बहुमताच्या जोरावर प्रस्ताव मंजूर झाला.



दरम्यान, या विषयावर चर्चा सुरू होताच शिवसेनेचे नगरसेवक बिपिन चौधरी यांनी नगराध्यक्षांना निवेदन देत प्रस्ताव मंजूर करू नये, अन्यथा आत्मदहन करण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी केली. या घटनेमुळे काही काळ सभागृहात तणावाचे वातावरण निर्माण झाले. इतर नगरसेवकांनी समजूत काढल्यानंतर चौधरी यांचे निवेदन मागे घेण्याचा ठराव करण्यात आला. सभेत विषयपत्रिकेवरील अन्य २७ विषयांवरही चर्चा झाली. शहरातील रस्ते, उद्याने, चेनलिंक फेन्सिंग, म्युरल उभारणी, तसेच खुल्या जागांमध्ये व्यायाम साहित्य बसविण्याचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले. यावेळी व्यापारी संकुलातील गाळ्यांचे वाटप अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणाच्या तत्त्वानुसार करण्यात यावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक डॉ. निरज वाघमारे यांनी केली.

# वीज कोसळून शेतकऱ्याचा मृत्यू

## ११ बकऱ्या व एक स्वान दगावले

प्रतिनिधी १३ जून

**यवतमाळ :** वणी तालुक्यातील मौजा टाकळी येथे शुक्रवारी सायंकाळी झालेल्या वादळी पावसादरम्यान वीज कोसळून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या दुर्घटनेत ११ बकऱ्या आणि एक स्वानही दगावले. तहसील प्रशासनाकडून प्राप्त माहितीनुसार, विलास मनकू तुमराम (वय ५५) हे शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास गावालगतच्या शिवारात बकऱ्या चारण्यासाठी गेले होते. यावेळी अचानक वातावरणात बदल होऊन मेघगर्जनेसह पाऊस सुरू झाला. दरम्यान, त्यांच्या जवळच वीज कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत तुमराम यांच्या कळपातील ११ बकऱ्या तसेच एक स्वान यांचाही मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. अकस्मात घडलेल्या या घटनेमुळे टाकळी परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून, मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. प्रशासनाकडून शासकीय मदतीसंदर्भातील प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# 'कोट्यवधींची जागा कवडीमोल भावात'; ठरावाविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा



प्रतिनिधी १३ जून

**यवतमाळ :** शहरातील टीबी रुग्णालय परिसरातील नगरपालिकेच्या मालकीची मौल्यवान जागा ९० वर्षांच्या लीजवर देण्याच्या निर्णयाला काँग्रेसच्या नगरसेवकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे.

कोट्यवधी रुपयांच्या जागेची कवडीमोल भावात विल्हेवाट लावली जात असून त्यामुळे पालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होणार असल्याचा आरोप करत हा निर्णय न्यायालयात आव्हान देण्याचा इशारा काँग्रेसने दिला आहे.

शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेस नगरसेवकांनी सांगितले की, मुख्य बाजारपेठेतील टीबी रुग्णालय परिसरातील सुमारे एक लाख ६५ हजार ७५४ चौरस फूट जागा बीओटी तत्त्वावर विकासकाला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या जागेचे बाजारमूल्य सुमारे साडेतीनशे कोटी रुपये असल्याचा दावा करत केवळ ९५ कोटी रुपयांत ती देण्याचा निर्णय पालिकेसाठी तोट्याचा असल्याचे त्यांनी म्हटले.

नगरसेवकांच्या मते, १९९२ च्या शासन निर्णयानुसार लीजवरील जागा मर्यादित कालावधीसाठी देण्याची तरतूद असताना ९० वर्षांच्या लीजचा प्रस्ताव पुढे आणण्यात आला आहे. प्रस्तावित प्रकल्पात पाच मजली व्यापारी संकुल, दोन मल्टिप्लेक्स, खुली जागा आणि पार्किंगचा समावेश आहे. विकासकाकडून ९५ कोटी रुपयांची रक्कम टप्प्याटप्प्याने पाच हप्त्यांमध्ये देण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या जागेवर अनेक वर्षांपासून लहान-मोठे व्यावसायिक व्यवसाय करीत होते. अलीकडेच त्यांना नोटिसा बजावून जागा रिकामी करण्यात आल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याचा मुद्दाही काँग्रेसने उपस्थित केला.

पालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत हा ठराव मंजूर करताना विरोधकांना विश्वासात घेतले गेले नाही, असा आरोप करत व्यापारी संकुलातील गाळ्यांच्या वाटपाबाबत कोणतीही स्पष्ट आरक्षण अथवा पुनर्वसन योजना नसल्याची टीकाही करण्यात आली. या निर्णयामुळे पालिकेचे दोनशे ते अडीचशे कोटी रुपयांचे नुकसान होऊ शकते, असा दावा काँग्रेसने केला.

प्रस्तावित व्यापार संकुलाचा निर्णय रद्द न केल्यास उच्च न्यायालयात दाद मागण्यात येईल, असा इशारा काँग्रेस गटनेत्या वैशाली सवई यांच्यासह संतोष बोरले, बबलू उर्फ अनिल देशमुख, जावेद अन्सारी, प्रमोद बगाडे, सविता चव्हाण, कृष्णा पुसनाके आणि इतर नगरसेवकांनी दिला. पत्रकार परिषदेला काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दारूसाठी पैसे न दिल्याचा राग; मारहाण प्रकरणातील आरोपीला दोन वर्षांचा कारावास

प्रतिनिधी १३ जून

**कळंब :** दारू पिण्यासाठी पैसे मागितल्यावर नकार दिल्याच्या रागातून बैलगाडीच्या लाकडी उभारीने मारहाण करून गंभीर दुखापत केल्याप्रकरणी कळंब न्यायालयाने आरोपीस दोन वर्षांच्या सश्रम कारावासाची व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास एक महिन्यांच्या अतिरिक्त कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे.

प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी एच. एन. पोले यांनी हा निकाल दिला. आकाश उर्फ गोलू मारोतराव नारनवरे (वय २८, रा. माटेगाव, ता. कळंब) असे दोषी ठरलेल्या आरोपीचे नाव आहे.

अभियोजन पक्षाच्या माहितीनुसार, २०२२ मध्ये घडलेल्या घटनेत आरोपीने फिर्यादीकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले होते. फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपीने वाद घालत बैलगाडीच्या लाकडी उभारीने फिर्यादीच्या हात, डाव्या पायावर व छातीवर वार करून गंभीर जखमी केले. फिर्यादीच्या तक्रारीवरून कळंब पोलिस ठाण्यात भादंवि कलम ३२६, ३२४, ५०४ व ५०६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणाचा तपास सहाय्यक फौजदार सुरेश झोटिंग यांनी केला. तपासादरम्यान आरोपीविरुद्ध सबळ पुरावे आढळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. खटल्यादरम्यान सरकारी पक्षातर्फे नऊ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. साक्षीदारांचे जबाब व वैद्यकीय पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता ॲड. आर. आर. त्रिवेदी यांनी कामकाज पाहिले. त्यांना कळंब पोलिस ठाण्याचे कोर्ट मोहोरार पोलीस नाईक मनोज डुबरे यांचे सहकार्य लाभले. तसेच पोलिस अधीक्षक, अप्पर पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी आणि पोलिस निरीक्षक धनराज निळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात आला.

# अखेर खनिकर्मकडून बोरी-चातारी रेतीघाटाची पाहणी

प्रतिनिधी १३ जून

## अवैध उत्खननाच्या तक्रारींना मिळाले बळ; रेतीघाटाची मुदत संपल्यानंतर पथक दाखल

**उमरखेड :** पैनगंगा नदीपात्रातील बोरी-चातारी रेतीघाटावर मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन झाल्याच्या तक्रारींनंतर अखेर जिल्हा खनिकर्म कार्यालयाचे पथक शुक्रवारी (दि. १२) प्रत्यक्ष पाहणीसाठी दाखल झाले. रेतीघाटाची मुदत संपल्यानंतर करण्यात आलेल्या या पाहणीमुळे अवैध रेती उत्खननाच्या आरोपांवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

बोरी-चातारी रेतीघाटावर रेती हंगाम २०२६ दरम्यान मोठ्या प्रमाणात उत्खनन होऊन नदीपात्र विद्रूप झाल्याचा आरोप तक्रारकर्त्यांनी केला होता. त्यानुसार भौगोलिक



माहिती प्रणाली सहाय्यक धनाजी जाधव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने स्थानिक महसूल अधिकाऱ्यांसह नदीपात्राची पाहणी केली. पथकात महसूल सहाय्यक सुरेश ठोंबरे, वाहनचालक निलेश भाटबडवे, तलाठी राहुल चव्हाण आणि पोलीस पाटील प्रदीप माने यांचा समावेश होता.

गेल्या काही महिन्यांपासून या रेतीघाटावरून मोठ्या प्रमाणात रेती तस्करी होत असल्याच्या तक्रारी महसूल प्रशासनाकडे करण्यात येत होत्या. मार्च महिन्यात स्थानिक गुन्हे शाखेने कारवाईचा प्रयत्न केला होता. त्यानंतरही रेती उत्खनन सुरूच राहिल्याचा आरोप पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे.

दरम्यान, रेतीघाटाची मुदत १० जून रोजी संपल्यानंतर ११ जूनला नदीपात्रात पाणी सोडण्यात आले. मात्र बोरी परिसरात पाणी न पोहोचल्याने उत्खननाचे स्वरूप स्पष्टपणे दिसून आल्याचे तक्रारकर्त्यांचे म्हणणे आहे.

भौगोलिक माहिती प्रणाली सहाय्यक धनाजी जाधव यांनी पाहणीनंतर सांगितले की, पैनगंगा नदीपात्रातील सुमारे तीन किलोमीटर परिसराची तपासणी करण्यात आली. काही ठिकाणी उत्खनन होऊन रेतीची चोरी झाल्याचे प्राथमिक पाहणीत दिसून आले आहे.

सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद देवसरकर यांनी मात्र पाहणीच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मोठ्या प्रमाणात उत्खनन झालेल्या ठिकाणांचे छायाचित्रण टाळण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला असून, यासंदर्भात उपलब्ध पुराव्यांच्या आधारे पुढील पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आता जिल्हा खनिकर्म विभागाच्या अहवालात नेमके काय निष्कर्ष नोंदवले जातात आणि संबंधितांवर कारवाई होते का, याकडे पर्यावरणप्रेमी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई; १५ जूनपर्यंत विशेष मोहीम



प्रतिनिधी १३ जून

**महागाव :** महागाव बसस्थानक परिसरात वाढलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विशेष कारवाई मोहीम सुरू केली आहे. बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरातील 'नो पार्किंग झोन'मध्ये अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर ५ ते १५ जूनदरम्यान कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

महागाव, उमरखेड, पुसद व फुलसांगवी मार्गांवर खाजगी चारचाकी आणि तीनचाकी वाहनांतून मोठ्या प्रमाणावर प्रवासी वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अनेक वाहने थेट बसस्थानक परिसरात थांबवून प्रवासी उचलत असल्याने वाहतूक कोंडीसह सुरक्षेचे प्रश्नही निर्माण होत आहेत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नात होत असलेल्या घटीस अवैध प्रवासी वाहतूक हे एक प्रमुख कारण असल्याचे निरीक्षण नागपूर खंडपीठाने जनहित याचिकेच्या सुनावणीदरम्यान नोंदविले होते. त्यानुसार राज्य परिवहन महामंडळाच्या मुख्य सुरक्षा व दक्षता विभागाने राज्यभर विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. महागाव बसस्थानक परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तैलचित्राजवळ तसेच बसस्थानक प्रवेशद्वार परिसरात खाजगी वाहनांची गर्दी वाढल्याचे दिसून येत आहे. काही वाहनचालकांकडून कमी भाड्याचे आमिष दाखवून प्रवासी आकर्षित केले जात असल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या सहकार्याने संयुक्त कारवाई करण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल, असे महागाव बसस्थानकाचे वाहतूक नियंत्रक बापूजी पारवेकर यांनी सांगितले. या मोहिमेमुळे अवैध प्रवासी वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विधान परिषद उमेदवारी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करा

प्रतिनिधी १३ जून

## शिफारसकर्त्यांवरही कारवाईची मागणी

**यवतमाळ :** यवतमाळ-वर्धा-चंद्रपूर विधान परिषद निवडणुकीतील काँग्रेसच्या उमेदवारी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून केवळ उमेदवारावरच नव्हे, तर त्यांची शिफारस करणाऱ्या नेते व पदाधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नई परवाज मूव्हमेंट (विदर्भ)चे संस्थापक अध्यक्ष तथा काँग्रेस कार्यकर्ते मोहम्मद आसिम अली यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना सविस्तर पत्र पाठविले आहे. काँग्रेसचे अधिकृत उमेदवार साहेबराव कामरे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या असून उमेदवार निवड प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



उमेदवारी कोणाच्या शिफारशीवर देण्यात आली, संबंधित नाव पक्षश्रेष्ठींकडे कोणी पाठविले आणि या प्रक्रियेत कोणाची भूमिका होती, याची सखोल चौकशी करून संबंधितांची नावे जाहीर करावीत, अशी मागणीही त्यांनी केली आहे. तसेच दोषी आढळणाऱ्यांवर कठोर संघटनात्मक कारवाई करण्यात यावी, अन्यथा भविष्यात अशा घटना पुन्हा घडण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

पक्षात पारदर्शकता, जबाबदारी आणि उत्तरदायित्व वाढविण्यासोबतच नव्या नेतृत्वाला संधी देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रामाणिक कार्यकर्त्यांचा पक्षावरील विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी स्वतंत्र चौकशी समिती नेमावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

"काँग्रेस वाचवा, कार्यकर्त्यांचा सन्मान करा," असे आवाहन मोहम्मद आसिम अली यांनी आपल्या पत्रातून केले आहे.

# करंजखेड ग्रामपंचायतीतील फेरफार प्रकरणी अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी

प्रतिनिधी १३ जून

**महागाव :** मौजा करंजखेड ग्रामपंचायतीच्या शासकीय अभिलेखांमध्ये कथितरीत्या चुकीच्या पद्धतीने फेरफार केल्याच्या प्रकरणात तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी किशोर पुरुषोत्तम घारड यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईबाबत संताप व्यक्त करण्यात येत आहे. या संदर्भात भिमराव गणपत भालेराव यांनी जिल्हा परिषद यवतमाळचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने खाते चौकशी सुरू करण्याची मागणी केली आहे.

करंजखेड येथील बौद्ध समाजाच्या जागेसंदर्भातील फेरफार प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नियुक्त समितीने २३ जानेवारी २०२६ रोजी अहवाल सादर केला होता. या अहवालात ग्रामपंचायतीकडून सार्वजनिक मालमत्तेचे अनधिकृत हस्तांतरण करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले असून, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ५५ व ५६ चे उल्लंघन झाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित फेरफार नोंद रद्द करून जागेची पूर्वस्थिती कायम करण्याचे निर्देशही देण्यात आले होते.

चौकशी अहवालात तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी किशोर घारड यांनी चुकीची फेरफार नोंद घेऊन अभिलेखांमध्ये खोडतोड केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तसेच त्यांच्या विरोधात खाते चौकशी व प्रशासकीय कारवाईस पात्र असल्याचे मत नोंदविण्यात आले होते. या अनुषंगाने पंचायत समिती महागावने ४ फेब्रुवारी २०२६ रोजी जागा पूर्ववत करण्याचे आदेश दिले, तर ११ फेब्रुवारी रोजी घारड यांना शिस्तभंगाची कारणे दाखवा नोटीस बजावली. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी या नोटीसला कोणतेही उत्तर दिले नसल्याचा दावा अर्जदाराने केला आहे. त्यानंतर 'आपले सरकार' पोर्टलवर तक्रार दाखल करण्यात आली. त्याअनुषंगाने पंचायत समितीने ६ एप्रिल २०२६ रोजी अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावली. मात्र या अंतिम नोटीसलाही कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आले नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, चौकशी अहवालाला चार महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपले म्हणणे सादर न केल्याचे गृहीत धरून तात्काळ खाते चौकशी सुरू करावी व शिस्तभंगाची प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी भिमराव गणपत भालेराव यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.

# लोकशाहीचा आरसा की सत्तेचा चोरदरवाजा?

प्रतिनिधी १३ जून

## विधान परिषद 'पुनर्वसन केंद्र' बनतेय का?

**बाभूळगाव :** लोकशाहीत मतपेटी हा अंतिम न्यायाधीश मानला जातो. मतदार पाच वर्षांनी एकदा मतदान करतो, तेव्हा तो केवळ प्रतिनिधी निवडत नसतो; तर सत्ताधाऱ्यांना मान्यता किंवा नकारही देत असतो. मात्र निवडणुकीनंतर वारंवार एक प्रश्न उपस्थित होतो— जनतेने नाकारलेल्या नेत्यांना पुन्हा सत्तेच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी विधान परिषदेचा वापर होत आहे का?

विधान परिषदेची संकल्पना अत्यंत उदात्त होती. शिक्षक, पदवीधर, साहित्यिक, सहकार क्षेत्रातील जाणकार, अभ्यासू आणि अनुभवी व्यक्तींनी राज्याच्या कायदेनिर्मितीत योगदान द्यावे, या उद्देशाने या सभागृहाची निर्मिती झाली. लोकप्रतिनिधींच्या राजकारणापलीकडे जाऊन राज्यकारभाराला बौद्धिक दिशा देणारे हे वरिष्ठ सभागृह असावे, अशी अपेक्षा होती.

परंतु आजचे वास्तव वेगळे चित्र दाखवते. निवडणुकीत पराभूत झालेले नेते, पक्षातील नाराज गटांचे समाधान, राजकीय तडजोडी आणि सत्तेची गणिते जुळवण्यासाठी विधान परिषदेचा वापर होत असल्याची धारणा जनमानसात वाढत आहे. त्यामुळे हे सभागृह 'विचारांचे व्यासपीठ' कमी आणि 'राजकीय पुनर्वसन केंद्र' अधिक वाटू लागले आहे.

कायद्याच्या चौकटीत हे सर्व वैध असले, तरी नैतिकतेच्या दृष्टीने प्रश्न उपस्थित होतात. जनतेने नाकारलेल्या व्यक्तीला दुसऱ्या मार्गाने सत्तेत आणणे म्हणजे मतदारांच्या निर्णयाचा अनादर नाही का? लोकशाहीचा आत्मा केवळ कायद्यात नसतो; तो जनतेच्या विश्वासात असतो.

याचा अर्थ विधान परिषद रद्द करावी, असा नाही. उलट तिचे अस्तित्व अधिक अर्थपूर्ण व्हावे, यासाठी सुधारणा आवश्यक आहेत. उमेदवारी देताना राजकीय निष्ठेपेक्षा बौद्धिक क्षमता, सामाजिक योगदान आणि सार्वजनिक जीवनातील कामगिरी यांना प्राधान्य मिळायला हवे. सरकारला प्रश्न विचारणारे, धोरणांची चिकित्सक तपासणी करणारे आणि दीर्घकालीन दृष्टी देणारे सभागृह म्हणून विधान परिषदेची ओळख निर्माण झाली पाहिजे.

आजही एक प्रश्न अनुत्तरित आहे - जर हे सभागृह समाजातील सर्वोत्तम बुद्धिमत्तेचे प्रतिनिधित्व करणार असेल, तर उमेदवारांच्या निवडीची प्रक्रिया अधिक पारदर्शक का नसावी? त्यांच्या कार्याचा सार्वजनिक लेखाजोखा जनतेसमोर का ठेवला जात नाही?

विधान परिषदेवर मोठा सार्वजनिक खर्च होतो. जर त्यातून राज्याला विचारांची दिशा, धोरणात्मक मार्गदर्शन आणि लोकहिताचे निर्णय मिळत असतील, तर ती लोकशाहीवरील गुंतवणूक आहे. मात्र जर ते केवळ राजकीय तडजोडींचे व्यासपीठ ठरत असेल, तर तो जनतेच्या पैशांचा अपव्यय ठरतो. आजची तरुण पिढी प्रश्न विचारते, उत्तरांची मागणी करते. त्यामुळे विधान परिषद असावी की नसावी, यापेक्षा ती कोणाच्या हितासाठी आणि कोणत्या उद्देशाने कार्य करावी, हा खरा चर्चेचा विषय आहे.

लोकशाहीची ताकद तिच्या संस्थांमध्ये नसते; त्या संस्थांवर असलेल्या जनतेच्या विश्वासात असते. विधान परिषद जर खऱ्या अर्थाने जनहिताचा आवाज बनली, तर तिच्या अस्तित्वावर कोणी प्रश्नचिन्ह उपस्थित करणार नाही. पण जर ती सत्तेचा 'चोरदरवाजा' म्हणूनच ओळखली जाऊ लागली, तर लोकशाहीवरील विश्वास ढासळण्याचा धोका नाकारता येणार नाही.

# आर्णीत कावीळीचा वाढता प्रादुर्भाव

## पाणीपुरवठ्याची तातडीने तपासणी करा - नगरसेवक रियाज सय्यद यांची मागणी

प्रतिनिधी १३ जून

**आर्णी :** आर्णी शहरात हिपॅटायटिस (कावीळ) रोगाचा वाढता प्रादुर्भाव चिंतेचा विषय बनला असून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीच्या उपाययोजना राबविण्याची मागणी नगरसेवक सैय्यद रियाज सैय्यद वहाब यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगराध्यक्षांना निवेदन सादर करून शहरातील पाणीपुरवठा यंत्रणेची सखोल तपासणी करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शहरात विशेषतः दहा वर्षांपर्यंतची मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांमध्ये कावीळीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. काही रुग्णालयांना भेट दिल्यानंतर डॉक्टरांनीही अलीकडच्या काळात कावीळीच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याचे निदर्शनास आणून दिल्याचे नगरसेवकांनी म्हटले आहे. दूषित पाणीपुरवठा व पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेतील त्रुटी या आजाराच्या प्रसारामागील संभाव्य कारणांपैकी एक असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व पाणीपुरवठा स्त्रोतांची तातडीने तपासणी करावी, पिण्याच्या पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठवून त्यांची गुणवत्ता तपासावी, सर्व पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करावे, तसेच गळती असलेल्या पाणीवाहिन्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय जलशुद्धीकरण केंद्रातील क्लोरीन प्रक्रियेची नियमित तपासणी, आरोग्य विभागामार्फत विशेष आरोग्य शिबिरे व जनजागृती मोहीम, तसेच कावीळीपासून बचावासाठी नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून त्याचा अहवाल सर्वसाधारण सभेसमोर सादर करावा, अशीही मागणी नगरसेवक रियाज सय्यद यांनी केली आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा गंभीर विषय असून प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय द्वारा ॲड राजेश शहा बिल्डींग (लाला बिल्डींग समोर ) अवधूतवाडी यवतमाळ ता. जि. यवतमाळ येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A3072, RRC Helpline No. 8484842135